**M.A. (PART – II)**
**-: MARATHI :-**
***Study of an Ancient Period***
**(Paper – II) (June-2019)**

**: 94105 / Marathi - Paper - II- Study of an Ancient Period.**

**[वेळ: ३ तास]** **[गुण: १००]**

**सूचना:** १. **सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.**
२. **सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

प्र.१ अ) "समाजजीवनाचे सर्वांगीण प्रतिबिंब पडलेले आहे हे त्या त्या काळातील साहित्यकृतींमधून दिसून येते" या विधानाचा परामर्श कालखंडाच्या अभ्यासाच्या दृष्टीकोणातून घ्या.

**किंवा**

ब) बहामनी कालखंडातील सामाजिक व सांस्कृतिक समाजजीवनाचे दर्शन तत्कालीन लेखन प्रवृत्तीतून कसे घडते ते साधार लिहा.

प्र.२ अ) 'संत एकनाथांची स्फुट वाङ्मय रचना ही समकालीन समाजजीवनाचा खरा हुंकार आहे.' या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

ब) टीपा लिहा.
१. 'रुक्मिणीस्वयंवरातील सामाजिक जीवन
२. चतुःश्लोकी भागवत

प्र.३ अ) बहामन कालखंडातील सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब मुक्तेश्वरांच्या आख्यानक काव्यातून कसे दिसते ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

ब) टिपा लिहा.
१. मुक्तेश्वरांच्या लेखनाची वैशिष्ट्ये
२. 'संक्षिप्त रामायण' वरील इतर रामायणांचा प्रभाव.

प्र.४ अ) "संत तुकारामांच्या अभंगातून समकालीन समाजातील विविध अंधश्रद्धा व रूढीपरंपरांचे दर्शन घडते." या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

ब) टीपा लिहा.
१. तुकारामांचे 'पाईकीचे अभंग'
२. तुकारामांच्या अभंगातून आलेले दांभिकते विरुद्धचे बंड

प्र.५ अ) 'बहामन काळात अन्य धर्मियांनी मराठी ग्रंथलेखन करून मराठी साहित्य समृद्ध केले आहे' या विधानाचा परमर्श घ्या.

**किंवा**

ब) टीपा लिहा.
१. 'गुरुचरित्र'
२. ख्रिस्ती धर्मिय ग्रंथ

*********



CC96A91F8BF1A0D30158C5A68531DDDD

M.A. (PART – II)
-: MARATHI :-
*Theory of Literature*
(Paper – IV) (June-2019)

[Subjec]t Code: 94126 / Marathi - Paper IV- Theory of Literature.

वेळ तीन तास एकूण गुण १००

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे

२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्रश्न क्र. १ अ) साहित्य हे अन्य लेखनापेक्षा कोणकोणत्या बाबतीत वेगळे ठरते ते साधार सांगा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. कल्पनाशक्तीसंबंधीचा कांटचा विचार

२. कल्पनाशक्तीसंबंधीचा कोलरिजचा विचार

प्रश्न क्र. २ अ) पाश्चिमात्यांनी मांडलेल्या साहित्य प्रयोजनांचा परिचय करून द्या.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. साहित्याच्या वर्गीकरणाची तत्त्वे

२. ॲरिस्टॉटलचा अनुकृती सिद्धांत

प्रश्न क्र. ३ अ) साहित्यमूल्ये ही साध्यात्मक आहेत की साधनात्मक आहेत, यासंबंधी सविस्तर चर्चा करा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. साहित्यकृतीची सौंदर्यमूल्ये

२. सेंद्रीय एकात्मता

प्रश्न क्र. ४ अ) साहित्याच्या भाषेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. रोमांचवादाचे स्वरूप

२. वास्तववादाच्या मर्यादा

प्रश्न क्र. ५ अ) मार्क्सवादाचे विशेष साधार सांगा.

किंवा

आ) थोडक्यात लिहा-

१. भारतीय साहित्यशास्त्रातील प्रतिभाविचार

२. साहित्यभाषेच्या संदर्भातील विरोधाभासाचे तत्त्व

*****************



6BAA92287BB783ABBF9F4A5C6AB75193

वेळ तीन तास एकूण गुण १००

सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.
३. प्रश्न क्र. ५ साठी अंतर्गत पर्याय नाही.

प्रश्न क्र. १ अ) "साहित्याची समीक्षा करताना एकच एक पद्धती वापरता येत नाही": या विधानाची साधक बाधक चर्चा करा.

किंवा

आ) साहित्यसमीक्षेतील वाचन, विश्लेषण व अर्थनिर्णयन या टप्प्यांचा सविस्तर परिचय करून द्या.

प्रश्न क्र. २ अ) समाजशास्त्रीय समीक्षापद्धतीचा थोडक्यात परिचय करून द्या.

किंवा

आ) मानसशास्त्रीय समीक्षा पद्धतीची सामर्थ्ये व मर्यादा यांचा परिचय करून द्या.

प्रश्न क्र. ३ अ) 'रूपबंध' ही संकल्पना स्पष्ट करा व रूपवादी समीक्षा पद्धतीचा परिचय करून द्या.

किंवा

आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कवितांची रूपवादी पद्धतीने समीक्षा करा
१. ज्ञानदेव गेले तेव्हा- बा. भ. बोरकर
२. गढी- नारायण कुलकर्णी कवठेकर
३. डॉक्यूमेंटरी- विवेक मोहन राजापुरे
४. रंग महाली विठूच्या- अरुणा ढेरे

प्रश्न क्र. ४ अ) सिग्मंड फ्रॉईड व युंग यांचे सिद्धांत मानसशास्त्रीय समीक्षा करताना उपयुक्त ठरतात: चर्चा करा.

किंवा

आ) 'सावित्री' या कादंबरीची मानसशास्त्रीय समीक्षा करा.

प्रश्न क्र. ५ 'राजा ईडिपस' या नाटकाची रूपवादी पद्धतीने समीक्षा करा.

--------------



6BAA92287BB783ABBF9F4A5C6AE992F8

**M.A. (PART – II)**

**-: MARATHI :-**

***Dalit Sahitya***

**(Paper – VIII) (June-2019)**

**...de: 94201 / Marathi - Paper VIII- Dalit Sahitya.**

[वेळ: ३ तास ] [गुण: १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना: 1. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
2. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

प्र.१ अ) दलित साहित्याच्या विविध व्याख्या आणि दलित साहित्याची मूल्ये याविषयी चर्चा करा.

**किंवा**

ब) दलित साहित्य प्रवाहाचा इतर साहित्य प्रवाहाशी असलेला अनुबंध स्पष्ट करा.

प्र.२ अ) 'सायरनचे शहर मधील कविता महानगरी वास्तवाची भीषणता स्पष्ट करतात.' चर्चा करा.

**किंवा**

ब) 'वाट तुडवताना' या आत्मकथनातील विविध क्षेत्रीय अनुभव याविषयी सविस्तर चर्चा करा.

प्र.३ अ) 'शूद्र' या कांदबरीतील नागनाथच्या संघर्षाची विविध रूपे स्पष्ट करा.

**किंवा**

ब) डॉ. गंगाधर पानतावणे यांची दलित साहित्य आणि मराठी साहित्य याविषयी भूमिका स्पष्ट करा.

प्र.४ अ) "परिव्राजक" मधील कथा बुद्धधम्म तत्वांचे प्रकटीकरण करतात." चर्चा करा.

**किंवा**

ब) 'निब्बाण' या नाटकातील सांस्कृतिक आणि वैचारिक संघर्ष याविषयी साधार चर्चा करा.

प्र.५ टिपा लिहा: **(कोणत्याही दोन)**

अ) 'सायरनचे शहर' मधील प्रतिमासृष्टी
ब) 'शूद्र' मधील वातावरण
क) 'परिव्राजक' मधील पात्रे
ड) उत्तम कांबळे यांचे समाजकार्य

**************



E770712B0FC9A97BA8F06DE54C183EFF

# M.A. (PART – II)
## -: MARATHI :-
## *Lok Sahitya*
## (Paper – VIII) (June-2019)

: 94202 / Marathi - Paper VIII-Lok Sahitya.

[ Total Marks : 100

**सूचना :**

१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहेत.
**२) सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. अ) 'लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे' हे विधान स्पष्ट करा.

**किंवा**

आ) लोकसाहित्य म्हणजे काय सांगून लोकसाहित्याच्या निर्मितीप्रेरणांचा परामर्श घ्या.

२. अ) गोंधळ व जागरण या लोकनाट्यप्रकाराचे स्वरूप सांगून त्याचे लोकजीवनातील महत्व विशद करा .

**किंवा**

आ) 'लोकगीतांतून जीवनाच्या सर्व अंगाचा आविष्कार झालेला असतो' या विधानाची साधार चर्चा करा.

३. अ) 'मराठी लोककथा' या कथासंग्रहातील कथांचे अनुभवविश्व उलगडून दाखवा.

**किंवा**

आ) 'मराठी लोककथा' या संग्रहामधील कथांचे भाषिक विशेष नोंदवा.

४. 'रानभूल' या नाटकातून आदिवासींचे शोषण कशाप्रकारे मांडले आहे ते साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'रानभूल' या नाटकाच्या संहितेचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

५. कोळी लोकगीतांच्या विषयाची विविधता साधार विशद करा.

**किंवा**

लोकमानसातील पारंपरिक कोळीगीतांचे स्वरूप सांगून भाषिक विशेष नोंदवा.

-----------------------------